CS(M) EXAM 2012

G-DTN-M-NSUB

# MARATHI

## Paper II

## (Literature)

*Time Allowed : Three Hours* | *Maximum Marks : 300*

---

*INSTRUCTIONS*

***Candidates should attempt questions no. 1 and 5 which are compulsory, and any THREE of the remaining questions, selecting at least ONE question from each Section.***

***The number of marks carried by each question is indicated at the end of the question.***

***Answers must be written in Marathi.***

***IMPORTANT : Whenever a question is being attempted, all its parts/sub-parts must be attempted contiguously. This means that before moving on to the next question to be attempted, candidates must finish attempting all parts/sub-parts of the previous question attempted. This is to be strictly followed.***

***Pages left blank in the answer-book are to be clearly struck out in ink. Any answers that follow pages left blank may not be given credit.***

---

## SECTION A

1. पुढील पाच उताऱ्यांचे प्रत्येकी 150 शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा. *12×5=60*

   (a) एकु दिसु धर्मवार्तासमैं भटोबासीं म्हणितलें : तोंडिं तांबुळ माथां फुलैं : यैसा उपभोगी अनुसरणा निगे आणि तेधवांचि सरे : तया नाचरतांचि ईश्वरगति गा : ।।शोधु :।। यावरि सामान्य स्त्रीचा दृष्टांतु वाखाणे : ।।

   (b) दर फाल्गुनमासीं होळीपूजा करितांच; शेतकऱ्याजवळचें द्रव्य उडालें यास्तव म्हणा, अगर हिंदूधर्माचे नांवानें ठणाणा बोंबा मारितात, तरी हे भटजीबुवा त्यांजपासून कांहीं दक्षिणा घेतल्याविना त्यांस आपापल्या डोचक्यात धूळमाती घालण्याकरितां मोकळीक देत नाहींत.

   (c) स्वार्थत्याग करून कोणीं लग्न लावूं नये. लग्नाच्या बाबतींत स्वार्थत्याग करण्याचा कोणासच हक्क नाहीं. केवळ आपलेंच नुकसान करून तो स्वार्थत्याग करतो असें नाहीं; इतरांचेच नुकसान करून करतो.

   (d) मला आता ह्या पोरीसारखं वेसवा बनावं लागेल. अन् तुम्हाला माझी पाटी सांभाळावी लागेल. मी गायकवाडाची लेक, भोसल्याची सून नवऱ्यासाठी हे करायला तयार आहे... नाहीतर माझ्या पाटीवर उभ्या असलेल्या कोणाचाही हात धरून जावं लागेल. बोला, मी काय करू ?

   (e) स्त्रियांचं वय जरी त्यांच्या ओठांनी लपविलं तरी त्यांच्या गालांतून बाहेर उमटल्याखेरीज ते कसे राहील ? कौमार्यावस्थेची सरहद्द संपली की लज्जेचे हे लालभडक बावटे दोन्ही गालांवर लागलेच फडकायला !

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 250 शब्दांत लिहा. *20×3=60*

(a) जोतीराव फुले यांनी 'शेतकऱ्याचा असूड' मध्ये शेतकऱ्यांचे दुःस्थितिवर्णन कशा प्रकारे केले आहे ते विश्लेषणपूर्वक लिहा.

(b) 'साष्टांग नमस्कार' मधील विविध विनोदरूपांचा परामर्श घ्या.

(c) 'शिळान अधिक आठ कथा' मधील कथनरूपांचे वेगवेगळे विशेष साधार लिहा.

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 250 शब्दांत लिहा. *20×3=60*

(a) 'ब्राह्मणकन्या' ही कादंबरी असण्याऐवजी समाजप्रबोधनपर गद्य आहे असे म्हणता येईल का ? सकारण चर्चा करा.

(b) 'जन हे वोळतु जेथे' या कादंबरीचे यशापयश निश्चित करा.

(c) 'एकेक पान गळावया' या कादंबरीच्या भाषेचे बहुविध विशेष सोदाहरण सांगा.

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 250 शब्दांत लिहा. *20×3=60*

(a) 'जेव्हा मी जात चोरली होती' च्या आधारे बाबुराव बागूल यांच्या कथालेखनाची बलस्थाने विशद करा.

(b) 'आठवणींचे पक्षी' च्या लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाची बहुविध अंगे सोदाहरण स्पष्ट करा.

(c) 'स्मृतिस्थळ' तील वेगवेगळ्या स्मृती कोणकोणत्या गोष्टी सांगत सुचवत आहेत ?

## SECTION B

5. पुढील पाच पद्यखंडाचे प्रत्येकी 150 शब्दांत रसास्वादपूर्वक सटीक स्पष्टीकरण करा. *12×5=60*

   (a) गूळ गोड न लागे म्हणावा । तैसा देव न लागे वानावा ।
   सेवि तोचि चवी जाणे । येरां सांगतां लाजिरवाणें ।
   नाभा म्हणे या खुणा । तुम्ही ओळखा पंढरिराणा ।।

   (b) तदितर खग भेणें वेगळाले पळाले
   उपवनजलकेली जे कराया मिळाले ।
   स्वजन गवसला जो त्याजपाशीं नसे तो
   कठिण समय येतां कोण कामास येतो ।।

   (c) धन्य वंश एकेक पुरुष जणुं कल्पवृक्ष पिकले ।
   शतवर्षे द्विज पक्षी आनंदें त्या तरुवर टिकले ।।
   जलचर हैदर नबाब सन्मुख रण करितां थकले ।
   ज्यांनीं पुण्याकडे विलोकिलें ते संपत्तिला मुकले ।।

   (d) दिव्य गायनें, दिव्य शान्तता, दिव्याचे झोत,
   वसुंधरेच्या अरुण ओतितो नकळत हृदयांत !
   त्या दिव्यानें स्वर्भूमीचें ऐक्य असें केलें;
   त्या दिव्यानें मांगल्याचे पाट सुरू झाले !

   (e) त्या दाट लांब केसांचा
   वाऱ्यावर उडतो साज
   दुःखांत अंबरें झुलती
   कीं अंग झाकते लाज....

6. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 250 शब्दांत लिहा. *20×3=60*

(a) नामदेवांच्या काव्यरचनेतील भावनेची विविधता सोदाहरण स्पष्ट करा.

(b) पंडिती काव्याचे कोणकोणते विशेष 'दमयंती स्वयंवरा'त आढळतात ? साधार लिहा.

(c) शाहिरांच्या लावण्यापोवाड्यांतून घडणाऱ्या समाजदर्शनाचे परीक्षण करा.

7. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 250 शब्दांत लिहा. *20×3=60*

(a) बालकवींच्या निसर्गकवितेची बहुविध गुणवैशिष्ट्ये विवरणपूर्वक लिहा.

(b) 'विशाखा' मधील प्रेमभावनेची वेगवेगळी रूपे सप्रमाण वर्णन करून सांगा.

(c) 'मृद्‌गंध' मधील प्रतिमासृष्टीचे निराळेपण उदाहरणे देऊन स्पष्ट करा.

8. पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी 250 शब्दांत लिहा. *20×3=60*

(a) 'जाहीरनामा' मधील कविता ही समग्र मानवजातीला उद्देशून लिहिली आहे, या विधानाची यथार्थता समजावून सांगा.

(b) 'संध्याकाळच्या कवितां'चे सौंदर्य कोणकोणत्या गुणविशेषांत सामावले आहे, ते विशद करा.

(c) 'या सत्तेत जीव रमत नाही' मधील सामाजिकतेचे स्वरूप प्रगल्भ आहे असे तुम्हाला वाटते का ? चर्चा करा.